## प्रेसनोट दि. ०९/०६/२०२३

## जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज व संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांचे आषाढी पालखी (वारी) सोहळ्याचे अनुशंगाने पिंपरी चिंचवड वाहतुक शाखेमार्फत करण्यात आलेले वाहतुकीचे नियोजन व तयारी

महाराष्ट्रातील विविध कानाकोपऱ्यातुन पालख्या आषाढी एकादशीचे दिवशी पंढरपुरात दाखल होत असतात त्यापैकी पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील देहु येथील जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज व संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांचे पालखीचे विशेष असे महत्व आहे. देहु व आळंदी ही धार्मिक क्षेत्रे असुन वारकरी समाजाची ती सर्वोच्च श्रद्धास्थाने आहेत. कोरोना कालावधीनंतर पहिल्यांदाच पारंपारिक असा ऐतिहासिक आषाढी वारी सोहळा साजरा होत असल्याने तो अत्यंत मन:पुर्वक साजरा केला जात आहे. सदर सोहळ्यामुळे संपुर्ण महराष्ट्रात चैतन्य निर्माण होत असुन सदर सोहळा पाहणेकरीता व अभ्यास करण्याकरीता राज्यातील तसेच परदेशातील लोक येत असतात. सदर सोहळा निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी पिंपरी चिंचवड पोलीस कटिबद्ध असुन सदर आषाढी सोहळ्याचे (वारीचे) अनुषंगाने पुढीलप्रमाणे वाहतुकीचे नियोजन व तयारी करण्यात आलेली आहे.

दिनांक १०/०६/२०२३ ते १२/०६/२०२३ रोजी पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे हद्दीत आषाढी पालखी (वारी) सोहळा साजरा होत असुन दोनही पालख्या या दिनांक १२/०६/२०२३ रोजी पुणे बाजुकडे प्रयाण करणार आहेत. त्यामुळे रोडवर मोठया प्रमाणावर नागरिकांची तसेच वारकऱ्यांची वर्दळ राहणार आहे.

जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज यांची पालखी श्री क्षेत्र देहु मंदिर ते अजिंठा चौक - भक्ती शक्ती चौक- आकुर्डी विठ्ठल मंदिर- काळभोर नगर- मोरवाडी चौक- नाशिक फाटा - हॅरिष ब्रिजवरुन पुणे हद्दीत जाणार असुन संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी आळंदी मंदिर ते मॅक्झीन चौक ते बोपखेल फाटा मार्गे पुणे हद्दीत प्रवेश करणार आहे. सदर सोहळ्याकरीता पिंपरी चिंचवड वाहतुक शाखेकडील ०१ सहाय्यक पोलीस आयुक्त, १० पोलीस निरीक्षक, १६ सपोनि/पोउनि, २२० पोलीस अंमलदार व १५६ वार्डन यांना तैनात करण्यात आले असुन बाहेरील जिल्ह्यातुन १ पोलीस उपायुक्त, १ सहायक पोलीस आयुक्त, ६ सपोनि/पोउनि व १२० पोलीस अंमलदार यांना तैनात करण्यात आलेले आहे. तसेच पिंपरी चिंचवड मुख्यालयाकडील ५० पोलीस अंमलदार तैनात करण्यात आलेले आहेत. असे एकुण ०१ पोलीस उप आयुक्त,०२ सहाय्यक पोलीस आयुक्त, १० पोलीस निरीक्षक, २२ सपोनि/पोउनि, ३९० असा वाहतूक विभागाकडुन बंदोबस्त लावण्यात आलेला आहे.

पालखी उत्सव (दिंडी) सोहळा निर्वीघ्नपणे पार पाडणेकरता व पालखी मार्गक्रमण सुरळित विनाअडथळा पार पाडणे व शहरातील इतर दळणवळण सुव्यवस्थीत चालु ठेवणेकरीता वरील मार्गावरील वाहतुक वळविणे गरजेचे असल्याने इकडील कार्यालयीन जावक क्र पोउआ/वाहतुक/नियोजन/२२०५०३ /२०२३ दिनांक ०६/०६/२०२३ अन्वये वाहतुक बदलाची अधिसुचना प्रसारीत करण्यात आलेली असुन सदरचे डायव्हर्शनकरीता ५५० बॅरिकेट्स, ६० दोर, ०३ क्रेन, ०६ टोईंग व्हॅनचा वापर करण्यात येत आहे.

तरी नागरीकांनी सदर आषाढी वारी पालखी सोहळा निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे वाहतुक शाखेमार्फत करण्यात आलेल्या वाहतुक डायव्हर्शनचे पालन करुन वाहतुक शाखेस सहकार्य करावे असे अवाहन नागरीकांना पिंपरी चिंचवड वाहतुक शाखेमार्फत करण्यात येत आहे.

Kubade ९/६/२०२३


(विठ्ठल कुबडे)

सहा.पोलीस आयुक्त,

वाहतुक शाखा,पिंपरी चिंचवड शहर


Scanned with CamScanner

# JAGATGURU SHREE SANT TUKARAM MAHARAJ PALKHI MARG
## PIMPRI CHINCHWAD
### *LENGTH : 21.9 KM*




Scanned with CamScanner

# SANT SHRESHTHA SHREE. DYANESHWAR MAHARAJ PALKHI MARG
## PIMPRI CHINCHWAD
### *LENGTH: 10.5 KM*




Scanned with CamScanner

५. परिशिष्ट ४ :- पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाअंतर्गत वाहतुकीत करण्यात आलेले बदल

दिनांक १०/६/२०२३ पासुन आषाढी पालखी (दिंडी) सोहळा सुरु होणार असुन दिनांक ११/६/२०२३ रोजी जगतगुरु श्री संत तुकाराम महाराज यांची पालखी देहु इनामदार वाडा येथुन विठ्ठल मंदीर आकुर्डी येथे मुक्कामासाठी येणार आहे.तसेच संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज याची पालखी गांधीवाडा आळंदी येथे दिनांक ११/०६/२०२३ रोजी मुक्काम करणार असुन तद्नंतर दोन्ही पालख्या दिनांक १२/०६/२०२३ रोजी पुणे बाजुकडे प्रयाण करणार आहेत. त्यामुळे रोडवर मोठया प्रमाणावर नागरिकांची तसेच वारकऱ्यांची वर्दळ राहणार असुन पालखी उत्सव (दिंडी) सोहळा निर्वीघ्नपणे पार पाडणेकरता सदर मार्गावरील वाहतुक वळविणे गरजेचे असल्याने इकडील कार्यालयीन जावक क्र पोउआ/वाहतुक/नियोजन/२२०५०३/२०२३ दिनांक ०६/०६/२०२३ अन्वये वाहतुक बदलाची अधिसुचना प्रसारीत करण्यात आलेली असुन पालखी मार्गावर पिंपरी चिंचवड आयुक्तालयातील वाहतुक विभागानुसार खालीलप्रमाणे वाहतुक बदल करण्यात आलेला आहे.

**४.१ दिघी आळंदी वाहतुक विभाग**

| अ क्र | बंद करणारा मार्ग | पासुन | | पर्यंत | | ठिकाण | पर्यायी मार्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ | | |
| १. | चिंबळी ते आळंदी रस्ता | ८/६/२३ | १२.०० | १२/६/२३ | २१.०० | चिंबळी फाटा चौक, चाकण येथुन आळंदीकडे येणारी वाहने | १. जयगणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे<br>२. भोसरी चौक-मॅगझीनचौक |
| २. | चाकण ते आळंदी रस्ता | ८/६/२३ | १२.०० | १२/६/२३ | २१.०० | आळंदी फाटा चौक, चाकण येथुन आळंदीकडे येणारी वाहने | १. जयगणेश साम्राज्य चौक, अलंकापुरमचौक मार्गे<br>२. भोसरी चौक-मॅगझीनचौक |
| ३. | वडगाव घेणंद ते आळंदी | ८/६/२३ | १२.०० | १२/६/२३ | २१.०० | चाकण-वडगांव घेणंद शेळपिंपळगाव मार्गे आळंदीकडे येणारी वाहने | १. कोयाळी कमान, कोयाळी-मरकळगाव मार्गे |
| ४. | मरकळ ते आळंदी रस्ता | ८/६/२३ | १२.०० | १२/६/२३ | २१.०० | मरकळकडुन धानोरेफाट्या मार्गे आळंदीकडे येणारी वाहने | धानोरेफाटा - चऱ्होली फाटा- मॅगझीनचौक /अलंकापुरमचौक मार्गे |
| ५ | विश्रांतवाडी ते आळंदी रस्ता | ८/६/२३ | १२.०० | १२/६/२३ | २१.०० | पुणे-दिघी मॅगझीन चौकाकडुन आळंदीकडे येणारी वाहने | १. भोसरी-मोशी-चाकण मार्गे,<br>२. चऱ्होली फाटा ते कोयाळी, शेळपिंपळगाव मार्गे जातील<br>३.अलंकापुरम - जयगणेश साम्राज्य चौक मार्गे |

Scanned with CamScanner

४.२ भोसरी वाहतुक विभाग

| अ क्र | बंद करणारा मार्ग | पासुन | | पर्यंत | | ठिकाण | पर्यायी मार्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ | | |
| १. | भारतमाता चौक ते आळंदी रस्ता | ८/६/२३ | १२.०० | १२/६/२३ | २१.०० | भारतमाता चौक, मोशी येथुन आळंदीकडे येणारी वाहने | १.जयगणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे<br>२. भोसरी चौक- मॅगझीन चौक<br>३. मोशी-चाकण-शिक्रापुर मार्गे |
| २. | मोशी आळंदी रस्ता | ८/६/२३ | १२.०० | १२/६/२३ | २१.०० | मोशी चौक येथुन आळंदीकडे येणारी वाहने | १. जयगणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे<br>२. भोसरी चौक-मॅगझीन चौक<br>३. मोशी-चाकण-शिक्रापुर मार्गे |
| ३. | जय गणेश साम्राज्य चौक ते अलंकापुरम | ११/६/२३ | ०६.०० | १२/६/२३ | २१.०० | पुणे नाशिक महामार्ग पांजरपोळ (जयगणेश साम्राज्य) चौकातुन वाहने आळंदी व आळंदी, विश्रांतवाडी मार्गे पुण्या कडे जाणार नाहीत. | सदरची वाहने नाशिकफाटा ओव्हर ब्रिज मार्गे सांगवी बाजुकडुन इच्छित स्थळी जातील |
| ४. | भोसरी ते दिघी मॅगझीन | ११/६/२३ | ०६.०० | १२/६/२३ | २१.०० | भोसरी आळंदी रोडने वाहने आळंदी व आळंदी, विश्रांतवाडी मार्गे पुण्याकडे जाणार नाहीत. | सदरची वाहने नाशिकफाटा ओव्हर ब्रिज मार्गे सांगवी बाजुकडुन इच्छित स्थळी जातील |
| ५ | भोसरी ते दिघी | ११/६/२३ | ०६.०० | १२/६/२३ | २१.०० | भोसरी दिघी रोडने वाहने आळंदी व आळंदी, विश्रांतवाडी मार्गे पुण्या कडे जाणार नाहीत. | सदरची वाहने नाशिकफाटा ओव्हर ब्रिज मार्गे सांगवी बाजुकडुन इच्छित स्थळी जातील |
| ६ | फुगेवाडी चौक ते हॅरिष ब्रिज ग्रेडसेपरेटर | १२/६/२३ | ०२.०० | १२/६/२३ | २१.०० | फुगेवाडी चौक | सदरची वाहने दापोडी ओव्हर ब्रिजने सांगवी अगर पुण्याकडे जातील. |
| ७ | शितळादेवी चौक ते फुगेवाडी चौक | १२/६/२३ | ०२.०० | १२/६/२३ | २१.०० | शितळादेवी चौक | सदरची वाहने सांगवी व बोपोडी औध रोड मार्गे इच्छित स्थळी जातील |
| ८ | दापोडी आंबेडकर चौक ते जुना पुणे मुंबई रोड | १२/६/२३ | ०२.०० | १२/६/२३ | २१.०० | आंबेडकर चौक | सदरची वाहने सांगवी व बोपोडी औध रोड मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| ९ | भोसरी ते शिवाजीनगर पुणे | १२/६/२३ | ०२.०० | १२/६/२३ | २१.०० | नाशिक फाटा ओव्हर ब्रिज जवळ | सदरची वाहने नाशिकफाटा ओव्हर ब्रिज मार्गे सांगवी बाजुकडुन इच्छित स्थळी जातील. |

Scanned with CamScanner

४.३ तळवडे वाहतुक विभाग

| अ क्र | बंद करणारा मार्ग | पासुन | | पर्यंत | | ठिकाण | पर्यायी मार्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ | | |
| १. | जुना मुंबई पुणे हायवे देहु कमान ते देहुगाव | ८/६/२३ | १२.०० | ११/६/२३ | १८.०० | देहुगाव कमान (जुना मुंबई-पुणे हायवे) ते परंडवाल चौक (देहुगाव) हा रोड सर्व प्रकारचे वाहनांसाठी बंद राहील. | भक्ती-शक्तीचौक ते त्रिवेणीनगर ते तळवडे गावठाण ते कॅनबे चौक ते खंडेलवाल चौक देहुगाव असा राहिल. |
| २ | चाकण ते कॅनबे चौक | ८/६/२३ | १२.०० | ११/६/२३ | १८.०० | तळवडे गावठाण चौक ते कॅनबे चौक ते महिंद्रा सर्कल हा रोड सर्व प्रकारच्या जड वाहनांसाठी बंद राहिल. | तळवडे गावठाण-चिखली ते डायमंड चौक ते मोईगाव मार्गे निघोजे एम.आय.डी. सी. जातील. |
| ३ | तळेगाव चाकण रोड देहुफाटा ते देहुगाव | ८/६/२३ | १२.०० | ११/६/२३ | १८.०० | तळेगाव-चाकण रोडवरील देहुफाटा येथुन देहुगाव जाणारे रस्त्यावरुन सर्व प्रकारची जड वाहतुक बंद राहिल. | एच.पी.चौक मार्गे इच्छित स्थळी राहिल. |
| ४ | देहुकमान ते चौदा टाळकरी कमान ते भैरवनाथ चौक | ८/६/२३ | १२.०० | ११/६/२३ | १८.०० | देहुकमान ते चौदा टाळकरी कमान ते भैरवनाथ चौक हा रस्ता सर्व प्रकारचे वाहनांसाठी बंद राहिल. | — |

Scanned with CamScanner

४.४ देहुरोड वाहतुक विभाग

| अ क्र | बंद करणारा मार्ग | पासुन | | पर्यंत | | ठिकाण | पर्यायी मार्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ | | |
| १. | जुना मुंबई पुणे हायवे देहु कमान ते देहुगाव | ८/६/२३ | १२.०० | ११/६/२३ | १८.०० | देहुगाव कमान (जुना मुंबई-पुणे हायवे) ते परंडवाल चौक (देहुगाव) हा रोड सर्व प्रकारचे वाहनांसाठी बंद राहील. | भक्ती-शक्तीचौक ते त्रिवेणीनगर ते तळवडे गावठाण ते कॅनबे चौक ते खंडेलवाल चौक देहुगाव असा राहिल. |
| २ | सेंट्रल चौक देहुरोड ते भक्ती शक्ती मार्गे | ११/६/२३ | ००.०१ | ११/६/२३ | १८.०० | जुना मुंबई पुणे हायवे रोडवरील सेंट्रल चौक देहुरोड ते भक्ती शक्ती मार्गे पुणे कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे. | सेंट्रल चौक- मामुर्डी – किवळे - भुमकर चौक- डांगे चौक मार्गे इच्छित स्थळी जातील |

Scanned with CamScanner

४.५ निगडी वाहतुक विभाग

| अ क्र | बंद करणारा मार्ग | पासुन | | पर्यंत | | ठिकाण | पर्यायी मार्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ | | |
| १. | जुना मुंबई पुणे हायवे भक्ती शक्ती चौक ते पुणे कडे जाणारा मार्ग | ११/६/२३ | ००.०१ | १२/६/२३ | २१.०० | भक्ती शक्ती चौक येथुन पुणे कडे येणारी वाहतुक जुन्या मुंबई पुणे रोडने जाण्यास मनाई. | काचघर चौककडुन बिजलीनगर चौक मार्गे डांगे चौकातुन पुणेकडे इतरत्र जातील. |
| २ | खंडोबा माळ चौक ते टिळक चौक | ११/६/२३ | ००.०१ | १२/६/२३ | २१.०० | खंडोबा माळ चौक | खंडोबामाळ चौक येथुन वाहतुक टिळक चौकाकडे न जावु देता ती थरमॅक्स चौक मार्गे किंवा चिंचवड मार्गे वळविणे. |
| ३ | तळवडे ते त्रिवेणीनगर चौक | ११/६/२३ | ००.०१ | १२/६/२३ | २१.०० | त्रिवेणीनगर चौक | त्रिवेणीनगर चौक येथे रुपीनगरकडुन येणारी वाहतुक भक्ती शक्ती चौकाकडे येवु न देता ती चिकन चौक मार्गे चाकणकडे वळवतील. |
| ४ | दुर्गामाता चौक ते टिळक चौक | ११/६/२३ | ००.०१ | १२/६/२३ | २१.०० | दुर्गामाता चौक | दुर्गामाताचौक चौकाकडे भोसरी कडुन येणारी वाहतुक टिळक चौकाकडे येवु न देता तळवडे रोडने चाकण मार्गाने मुंबईकडे वळविणे. |
| ५ | काचघर चौक ते भक्ती शक्ती | ११/६/२३ | ००.०१ | १२/६/२३ | २१.०० | काचघर चौक | काचघर चौक येथील वाहतुक सावली हॉटेल कडे व भक्ती शक्ती चौकाकडे येवु न देता ती भेळ चौका मार्गे वळतील. |
| ६ | लोकमान्य हॉस्पीटल ते टिळक चौक | ११/६/२३ | ००.०१ | १२/६/२३ | २१.०० | लोकमान्य हॉस्पीटल | लोकमान्य हॉस्पीटल कडुन येणारी वाहतुक टिळक चौकाकडे येवु न देता ती म्हाळसाकांत चौक मार्गाने खंडोबामाळ चौकाकडे वळवतील. |
| ७ | म्हाळसाकांत चौक ते खंडोबामाळ | ११/६/२३ | ००.०१ | १२/६/२३ | २१.०० | म्हाळसाकांत चौक | **पालखी मुक्कामाचे** ठिकाणी पोहचल्यांनतर म्हाळसाकांत चौकाकडुन येणारी वाहतुक आकुर्डी गावठाण खंडोबामाळ चौकाकडे येवु न देता ती टिळक चौक मार्गाने वळवतील. |

Scanned with CamScanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | दिप ज्योती अपार्टमेंट ते विठ्ठलमंदीर, आकुर्डी | ११/६/२३ | ००.०१ | १२/६/२३ | २१.०० | म्हाळसाकांत चौक | **पालखी मुक्कामाचे** ठिकाणी पोहचल्यानंतर दिपज्यांती अपाटमेंट आकुर्डी येथुन येणारी वाहतुक मुक्कामाचे ठिकाणाक डे येवु न देता ती म्हाळसाकांत चौकाकडे वळवतील. |
| ९ | विवेकनगर भाजी मंडई ते विठ्ठलमंदीर, आकुर्डी | ११/६/२३ | ००.०१ | १२/६/२३ | २१.०० | विवेकनगर भाजी मंडई | **पालखी मुक्कामाचे** ठिकाणी पोहचल्यानंतर विवेकनगर भाजी मंडई आकुर्डी कडून येणारी वाहतुक मुक्कामाचे ठिकाणाकडे येवु ने देता ती शिवम डेअरीला लागुन असलेल्या रोडने डावीकडे वळवुन म्हाळसाकांत चौकाकडे वळवतील. |
| १० | हनुमान मंदीर ते विठ्ठलमंदीर, आकुर्डी | ११/६/२३ | ००.०१ | १२/६/२३ | २१.०० | हनुमान मंदीर | **पालखी मुक्कामाचे** ठिकाणी पोहचल्यानंतर हनुमान मंदिर आकुर्डी येथुन येणारी वाहतुक मुक्कामाचे ठिकाणी येवु न देता ती म्हाळसाकांत चौकाकडे वळवतील. |
| ११ | सिध्देश्वर क्लॉसिक अपार्टमेंट ते विठ्ठलमंदीर आकुर्डी | ११/६/२३ | ००.०१ | १२/६/२३ | २१.०० | सिध्देश्वर क्लॉसिक अपार्टमेंट | **पालखी मुक्कामाचे** ठिकाणी पोहचल्यानंतर सिध्देश्वर क्लॉसिक अपार्टमेंट आकुर्डी येथुन येणारी वाहतुक मुक्कामाचे ठिकाणा येवु न देता ती म्हाळसाकांत चौकाकडे वळवतील. |
| १२ | काळभोर नगर ते भक्ती शक्ती चौक सर्व्हिस रोड बंद | ११/६/२३ | ००.०१ | १२/६/२३ | २१.०० | काळभोर नगर | काळभोर नगर पासुन भक्तीशक्ती चौकाकडे जाणारी वाहने ग्रेड सेपरेटर मधुन वळविणे. |
| १३ | विजलीनगर ते भक्ती शक्ती चौक | ११/६/२३ | ००.०१ | १२/६/२३ | २१.०० | विजलीनगर | बिजलीनगर चौकाकडुन भक्तीशक्ती चौकाकडे वाहतुक न सोडता ती रावेत मार्गे मुंबईकडे पाठविणे. |

Scanned with CamScanner

४.६ चिंचवड वाहतुक विभाग

| अ क्र | बंद करणारा मार्ग | पासुन | | पर्यंत | | ठिकाण | पर्यायी मार्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ | | |
| १. | बिजलीनगर ते भक्तीशक्ती चौक | १२/६/२३ | ०२.०० | १२/६/२३ | २१.०० | बिजलीनगर | सदरची वाहने ही बिजलीनगर चौक येथुन डावीकडे वळुन डी.वाय पाटील कॉलेज समोरील मार्गाने रावेत मार्गे मुंबईकडे अथवा डांगे चौक थेरगावकडे जातील. |
| २ | दळवीनगर ते खंडोबामाळ चौक व दळवीनगर ते चिंचवड स्टेशन कडे जाणारा रोड | १२/६/२३ | ०२.०० | १२/६/२३ | २१.०० | दळवीनगर | सदरची वाहने ही बिजलीनगर चौक मार्गाने स्थळी जातील. |
| ३ | चिंचवड गाव व चाफेकर उड्डानपुल ते महावीर चौक | १२/६/२३ | ०२.०० | १२/६/२३ | २१.०० | रिव्हर व्हयु चौक व चाफेकर चौक | सदरची वाहने ही चिंचवडे फार्म मार्गाने वाल्हेकरवाडी, रावेतमार्गे मुंबईकडे जातील |
| ४ | चिंचवडेनगर टी जंक्शनं ते महावीर चौक | १२/६/२३ | ०२.०० | १२/६/२३ | २१.०० | | सदरची वाहने ही चिंचवडे फार्म मार्गाने वाल्हेकरवाडी, रावेत मार्गे मुंबईकडे जातील. |
| ५ | लोकमान्य हॉस्पी. ते महावीर चौक | १२/६/२३ | ०२.०० | १२/६/२३ | २१.०० | लोकमान्य हॉस्पी. | सदरची वाहतूक लोकमान्य हॉस्पी. चौकातुन दळवीनगर मार्गे जातील. |
| ६ | एस.के.एसफ चौक ते खंडोबा माळ चौक | १२/६/२३ | ०२.०० | १२/६/२३ | २१.०० | एस.के.एफ चौक | बिजलीनगर चौक मार्गाने इच्छित स्थळी जातील. |

Scanned with CamScanner

४.७ पिंपरी वाहतुक विभाग

| अ क्र | बंद करणारा मार्ग | पासुन | | पर्यंत | | ठिकाण | पर्यायी मार्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ | | |
| १. | महावीर चौक ते डी मार्ट सर्व्हिस रोड बंद | १२/६/२३ | ०२.०० | १२/६/२३ | २१.०० | महावीर चौक | डी मार्ट समोरील ग्रेड सेपरेटर मधुन वळविण्यात येईल |
| २ | ॲटो क्लस्टर ते हनुमान मंदीर | १२/६/२३ | ०२.०० | १२/६/२३ | २१.०० | ॲटो क्लस्टर | मदर तेरेसा पुला वरुन काळेवाडी मार्गे वळविण्यात येणार आहे. |
| ३ | पिंपरी पुल ते सम्राट चौक | १२/६/२३ | ०२.०० | १२/६/२३ | २१.०० | अहिल्यादेवी होळकर चौक बंद | महावीर चौक मार्गे इच्छित स्थळी |
| ४ | पिंपरी चौक ते गांधीनगर | १२/६/२३ | ०२.०० | १२/६/२३ | २१.०० | आंबेडकर चौक | महावीर चौक मार्गे इच्छित स्थळी |
| ५ | गांधीनगर ते आंबेडकर चौक | १२/६/२३ | ०२.०० | १२/६/२३ | २१.०० | गांधीनगर | नेहरुनगर मार्गे इच्छित स्थळी |
| ६ | वल्लभनगर ते पुणे सर्व्हिस रोड बंद | १२/६/२३ | ०२.०० | १२/६/२३ | २१.०० | वल्लभनगर | ग्रेडसेपरेटर |

Scanned with CamScanner